# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता.अलिबाग जि. रायगड पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, ईमेल dycfalibag@mahaforesg.gov.in

पत्र

विषयः- वन जमिन रायगड
मौजे विंधणे, ता. उरण, जि. रायगड राखीव वन स.नं. 195/3 मे. पी.पी.खारपाटील कन्ट्रक्शन प्रा.लि. मु.पो.चिरनेर, ता. उरण, जि. रायगड

जावक क्र. ब/20/जमिन/ 3324/2016-17.
अलिबाग – 402 201, दिनांकः- 18/10/2016

प्रति,
श्री. सागर खारपाटील,
मे. पी.पी.खारपाटील कन्ट्रक्शन प्रा.लि.
मु.पो.चिरनेर, ता. उरण, जि. रायगड.

संदर्भः- आपलेकडील दिनांक 27/09/2016 रोजीचे पत्र.

आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये मौजे विंधणे सर्व्हे नंबर 221 व मौजे चिरनेर या गावांतील सर्व्हे नंबर 268, 269 मधून जोडरस्ता व 6" व्यासाची जी.आर भुमिगत पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक केबल टाकरणेकरीता वनजमिन मागणीचा प्रस्ताव या कार्यालयास एक प्रतीत सादर केला आहे.

प्रस्तावांतील कागदपत्रांची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1) प्रस्तावांतील Chronology of Events प्रस्तावांतील चेकलीस्ट नंतर सामील करुन त्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहार नमुद करणे आवश्यक आहे.

2) प्रस्तावांतील मागणी केलेल्या वनक्षेत्रांत वृक्ष तोड होत असल्यास त्याबाबचा येणार खर्च भरणेस तयार असलेबाबत प्रकल्प यंत्रणेकडील प्रमाणपत्र प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

3) प्रस्तावांतील मागणी केलेल्या वन क्षेत्रामध्ये वनहक्क बाधीत होत नसल्याबाबत विहित प्रपत्रांतील जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील वनहक्क अधिनियम, 2006 अंतर्गतचे प्रमाणपत्र प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

4) प्रस्तावांत मौजे विधणे व मौजे चिरनेर गावांतील वनक्षेत्राचा समावेश होत असल्याचे प्रस्तावांतील क्षेत्र विवरण तक्त्यावरुन दिसून येत आहे. तथापी प्रस्तावांत 7/12 उतारे व नकाशा फक्त मौजे विंधणे गांवाचे समाविष्ट आहे. मौजे चिरनेर गांवातील प्रस्तावांत समाविष्ट असणारे वन व वनक्षेत्राचे 7/12 उतारे व नकशा प्रस्तावांत जोडणे आवश्यक आहे.

5) प्रस्तावांत पाण्याची पाईपलाईन टाकणेची असल्याने चेकलीस्ट मधील अ.नं. 32 नुसार आवश्यकतेनुसार वन विभागास पाणी विनामोबदला देण्यात येईल याबाबत प्रमाणत्र प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

6) प्रस्तावांतील फॉर्म-अ मधील भाग-1 व प्रकल्प यंत्रणेचे अधिकृत स्वाक्षरीकर्ता हयांची स्वाक्षरी नाही.

7) <u>इंडेक्स मॅपः-</u>

1) इंडेक्स मॅपचे स्केल केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनानुसार नाही.
2) इंडेक्स मॅप वर बाबवार (Index) सुची देण्यात आलेली नाही.
3) इंडेक्स मॅपवर देण्यात आलेल्या क्षेत्र विवरण पत्रातील (Area Statement )वरील मजकुर सुस्पष्ट दिसुन येत नाही. परिणामी नियोजित प्रकल्पाचे आखणी मार्गासाठी बाधीत होणारे वनक्षेत्र/ वनेत्तर क्षेत्राचा बोध होत नाही. तरी नियोजित प्रकल्पासाठी बाधीत होणारे वनक्षेत्र/वनेत्तर क्षेत्राचे बाबवार तपशिल देणेत यावा.
4) कर्नाळा पक्षि अभयारण्य (इको-सेन्सीटीव्ह झोन)पासुनचे दर्शविणेत आलेले एरीयल अंतर नकाशाचे प्रमाणाशी मिळते-जुळते नाही.
5) सदरहु नकाशामध्ये दर्शविलेले कर्नाळा पक्षी अभयारण्याचे व सभोवतालचे पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र (ESZ)चे क्षेत्र शासनास प्रस्तावित केलेल्या क्षेत्राशी मिळते-जुळते नाही.
6) इंडेक्स मॅपवर नियोजित आखणी मार्गाव्यतीरीक्त इतर दोन पर्यायी मार्ग वेगवेगळया रंगाने दर्शवून त्यामध्ये किती वनक्षेत्र बाधीत होते. त्याचा तपशिल नकाशावर देणे आवश्यक आहे.
7) इंडेक्स मॅप वर पोहोच रस्त्याचे मार्ग दिसुन येत नाही तरी ज्या क्षेत्रासाठी रस्ता आवश्यक आहे.त्याचे ठिकाण ,नियोजित पोहच रस्ता तसेच ज्या मुळ रस्त्यापासुन नियोजित पोहोच रस्त्याचे आखणी मार्ग दर्शविणे आवश्यक आहे.
8) मौजे विंधणे नियोजित आखणी मार्ग ज्या मुळ रस्त्यापासुन करणेत येणार आहे.तो मुळ रस्ता नकाशात दर्शवुन त्याचा दर्जा कोणता ते नमुद करणे आवश्यक आहे. तसेच नियोजित पाण्याचे पाईपलाईनचे आखणी मार्ग व इलेक्ट्रीक केबल लाईन कोणत्या मुळ लाईन पासुन घेणेत येणार आहे. त्याचे मुळस्त्रोत नकाशावर वेगवेगळया रंगसंगतीने दर्शविणे आवश्यक आहे.

8) <u>लोकेशन मॅप</u>

1) प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या स्थळ पहाणी अहवालात मुददा क्र.1 मध्ये तसेच इतर प्रपत्रात नियोजित रस्त्याचे आखणी मार्गात बाधीत होणारे क्षेत्र सर्व्हे क्र. 268,269 हे. मौजे- विंधणे व मौजे- चिरनेर ता. उरण असे नमुद करणेत आलेले आहे. प्रस्तावासोबत फक्त मौजे- विंधणेचे गांव नकाशा (Location Map) जोडणेत आलेला आहे. तरी नियोजित प्रकल्पासाठी नेमका कोणते गांवाचे क्षेत्राचा समावेश नियोजित आखणी मार्गात होते हे निश्चीत होत नाही.
2) प्रस्तावातील पान क्र. 17 वर जोडणेत आलेल्या प्रपत्रात नियोजीत आखणी मार्गात वनक्षेत्राचे स.क्र.221,268,269 असे दर्शविणेत आलेले आहे. तरी सदरहु वनक्षेत्र कोणकोणत्या गांवाचे आहे. त्याचा तपशील नमुद करणे आवश्यक आहे.

3) मौजे- विंधणे गाव नकाशामध्ये समाविष्ट असलेल्या वनक्षेत्राचे वैधानिक दर्जानिहाय रंगसंगती देवुन ज्या क्षेत्रासाठी रस्त्याचे मागणी करणेत आलेली आहे. त्याचे ठिकाण दर्शवुन याचा वापर कोणत्या प्रयोजनासाठी होतो त्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

4) नकाशावर दर्शविलेले प्रमाण मुळ नकाशाचे प्रमाणाशी मिळते-जुळते नाही.

5) नकाशावरील सुचीनुसार नियोजित रस्त्याचे आखणी मार्गामध्ये बाधीत होणारे क्षेत्र दर्शविणेत आलेले नाही.

6) प्रस्तावासोबत जोडणेत आलेले गांवनकशा एकत्रीकरण योजनेनंतरचा गट क्रमांक दर्शविलेला आलेला आहे. या कर्यालयाचे अभिलेख जुने सर्व्हे क्र. वर अधारीत असलेने सोबत गटस्किम उतारे जोडुन नकशावर गट क्रमांक/सर्व्हे क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव फेर 7 प्रतीत या कार्यालयास फेर सादर करावा.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- वनक्षेत्र सर्व्हेक्षक, अलिबाग.

प्रतः- परिक्षेत्र वन अधिकारी, उरण यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी उक्त वनक्षेत्रांत मागणी केलेल्या क्षेत्रामध्ये वनभंग करुन रस्त्याकरीता वनेत्तर कामे केलेली आहेत अगर कसे याबाबत खात्री करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.